लोकसत्ता पु.पा.४.

# आझाद नगरच्या आगीचे कारण अस्पष्ट असल्याने चर्चेला उधाण

**लोकसत्ता वार्ताहर**



**भाईंदर :** भाईंदर पूर्व येथील आझाद नगर झोपडपट्टीमध्ये लागलेल्या आगीचे कारण २० दिवसांनंतरही स्पष्ट होऊ शकलेले नाही. त्यात घटनेनंतर हा भूखंड महापालिकेने मोकळा केला असल्यामुळे उलटसुलट चर्चांना शहरात उधाण आले आहे.

भाईंदर पूर्व येथील गोल्डन नेस्ट जवळ आझाद नगर हा परिसर आहे. याच जागेवर महापालिकेचे खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरणाचे आरक्षण आहे. याबाबत महापालिकेने विकासाकाला विकास हक्क प्रमाणपत्र देखील उपलब्ध करून दिले आहे. परंतु गेल्या कित्येक वर्षांपासून या जागेचा ताबा प्रशासनाने हाती न घेल्यामुळे त्यावर अतिक्रमण झाल्याचे दिसून आले होते. यात काही झोपड्या आणि अधिकतर दुकान, गोदाम उभारण्यात आले होते.

२८ फेब्रुवारी रोजी येथील झोपडपट्टीमध्ये आग लागल्याची घटना घडली होती. यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता; तर जवळपास चाळीसहुन अधिक घरे जळून खाक झाली होती. याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हाची नोंद करण्यात आली आहे. मात्र आगीचे मूळ कारण शोधण्याचा तपास सुरू असतानाच महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने टप्प्याटप्प्याने कारवाई करून हा संपूर्ण भूखंड मोकळा केला आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे अतिक्रमण बाधित असलेला भूखंड मोकळा झाल्याने नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तर कट रचून हा भूखंड मोकळा केला तर नाही ना? अशा उलटसुलट चर्चा सामान्य नागरिकांमध्ये सहज होत असल्याचे दिसून येत आहे. आझाद नगर शेजारीच महापालिकेचे बाळासाहेब ठाकरे कलादालन उभारले जात आहे. त्यामुळे भविष्यात या ठिकाणी मोठ्या संख्येने पर्यटक येण्याची शक्यता आहे.म्हणून बऱ्याच वर्षांपासून हा भूखंड महापालिकेला मोकळा करायचा होता. मात्र नागरी विरोध होत नसल्यामुळे ते शक्य होत नव्हते. तर आगीच्या घटनेनंतर ही कारवाई झाल्यामुळे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

> या घटनेचा अजूनही अंतिम अहवाल आलेला नाही. त्यामुळे आगीचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. परंतु लवकरच हा अहवाल येईल अशी आशा आहे. - धीरज कोळी,
> वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे

लोकसत्ता पु.पा.७.

# महामार्गावरील वाहतुकीला साहित्यांचा अडथळा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. मात्र या कामादरम्यान साहित्य अस्ताव्यस्त अवस्थेत पडून असल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण होऊलागले आहेत.

मुंबई, ठाणे, पालघर, वसई, विरार, मिरा-भाईंदर या शहरासह गुजरातला जोडणारा हा राष्ट्रीय महामार्ग आहे. या महामार्गावर पावसाळ्यात पडणारे खड्डे व त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या यातून सुटका व्हावी यासाठी महामार्ग प्राधिकरणाने १२१ किलोमीटरचा महामार्गाचे काँक्रीटीकरणाचे काम सुरू केले आहे. महामार्गावरील मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या वाहिनीवर हे काम सद्यस्थितीत युद्धपातळीवर सुरू आहे. परंतु या कामाच्या वेळी नियोजन न केल्याने आता महामार्गावर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

काँक्रीटीकरण कामादरम्यान वापरण्यात येत असलेले साहित्यसुद्धा काम संपल्यानंतर जागच्या जागी पडून असते. यात गोणी, सिमेंटचे ठोकळे, लोखंडी साहित्य पडून असल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण होऊ लागले आहेत. रस्त्याच्या मध्येच हे साहित्य असल्याने प्रवास करताना अपघात होण्याची भीती चालकांनी व्यक्त केली आहे. तर जे सिमेंटचे ठोकळे लावले आहेत ते दूरच्या अंतरावर आहेत. त्याला रेडियम सुद्धा लावले नसल्याने रात्रीच्या सुमारास अपघात घडत आहेत, असे वाहनचालकांनी सांगितले.

## समस्या काय?

- महामार्गावर काँक्रीटीकरणाच्या कामामुळे प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ लागली आहे.
- महामार्ग प्राधिकरणाकडून कामाच्या दरम्यान योग्य ते नियोजन न केल्याने वाहतूक नियमन करताना महामार्ग वाहतूक पोलिसांची दमछाक होऊ लागली आहे.
- महामार्ग प्राधिकरणाने नेमलेले ठेकेदार कामादरम्यान साहित्य जागीच टाकून देत आहेत. ते साहित्य वाहतुकीला अडथळा आणत असल्याने पोलिसांना ते बाजूला करावे लागते.
- उपाययोजना कराव्यात याबाबत महामार्ग पोलिसांनी प्राधिकरणाला पत्र दिले आहे. त्यावर अजूनही कोणत्याही उपाययोजना झाल्या नसल्याचे चिंचोटी महामार्ग केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल चिंतामण यांनी सांगितले आहे.

CS CamScanner

म.टा. ५-४-१.

## बेकायदा लॉटरीप्रकरणी आठ जणांवर गुन्हा

**मिरा-भाईंदर :** भाईंदरमध्ये बेकायदेशीर ऑनलाइन लॉटरी चालविली जात असून, त्यावर कारवाई करण्यात आली आहे. लॉटरी चालवणाऱ्या आणि खेळणाऱ्या आठ जणांवर भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या पथकाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. भाईंदर पश्चिमेच्या एचएम टॉकीज गल्लीत असणाऱ्या एका गाळ्यात बेकायदेशीररित्या लॉटरी चालवली जात असल्याची माहिती काशिमिरा गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने नुकताच छापा टाकला. यावेळी, परवानगी नसताना संगणकावर दोन जण लॉटरी चालवित असल्याचे दिसून आले. यासह सहा जण तिथे खेळताना सापडले. म्हणून लॉटरी व्यवसाय मालक सुधीर महाडिक, त्याचे दोन कर्मचारी आणि नागरिक अशा आठ जणांवर भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वादग्रस्त बांधकामावरून पालिकेला समन्स

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर



मिरा-भाईंदरच्या मुख्य मार्गाला लागून असणाऱ्या सर्व्हिस रोडवर एक नवीन इमारत उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. मनपाच्या इमारत दुरुस्ती परवानगीच्या नावाखाली हे बांधकाम केले जात असल्याने ते वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या प्रकरणी मानवी हक्क आयोगाने सुमोटो याचिका दाखल करीत, मनपाला समन्स बजावले आहे. तसेच त्या संदर्भात अहवाल सादर करण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत.

मिरा-भाईंदर शहराचा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गोल्डन नेस्ट हा मुख्य मार्ग आहे. या मार्गाला लागून सर्व्हिस रोड अनेक वर्षांपासून प्रस्तावित आहे. मधल्या काळात या रस्त्यावर बेकायदा बांधकामे करण्यात आल्याने ती मनपाकडून जमीनदोस्त करण्यात आली होती. हा रस्ता सध्या मुख्य मार्गावर सुरू असलेले मेट्रोचे काम आणि वाढलेली वाहनांची संख्या लक्षात घेता विकसित करण्याची अधिक आवश्यकता भासत आहे.

एकीकडे अशी परिस्थिती असताना, दुसरीकडे सर्व्हिस रोडच्या मोकळ्या जमिनीवर कोणतीही इमारत नसताना तिच्या दुरुस्तीची परवानगी मनपाकडून देण्यात आली आहे. त्याआधारे ही नवीन इमारत उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या संदर्भात अनेक तक्रारी करूनही मनपाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने हे बांधकाम वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. याची दखल आता मानवी हक्क आयोगाकडून घेण्यात आली आहे.

या प्रकरणी आयोगाने स्वतःहून याचिका दाखल करून घेतली आहे. तसेच मिरा-भाईंदर पालिका आणि मिरा-भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयाला समन्स बजावण्यात आले आहे. यात विविध प्रश्न करण्यात आले असून त्याचा अहवाल ३ एप्रिल रोजी पार पडणाऱ्या सुनावणीला सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पुढारी ५-४-१.

# घरफोडीत दीड लाखांचे दागिने चोरीला

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसई पूर्वेतील चांदीप गावात कपाटात ठेवलेले सुमारे एकलक्ष साठ हजारांचे दागिने नाहीसे झाल्याने त्या गृहिणीने मांडवी पोलिसांत दागिने लंपास झाल्याची तक्रार दाखल केली आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की, चांदीप गावातील प्रतीक गायकवाड यांची पत्नी शीतल हिने मागील २६ फेब्रुवारी रोजी आपल्याच घरातील बेडरूममध्ये असलेल्या कपाटाच्या लॉकर मध्ये मंगळसूत्रासह इतर काही दागिने ठेवले होते .हे दागिने शीतल काही समारंभ किंवा खास कार्यक्रम असल्यास परिधान करत असे .अश्याच प्रकारे १९ मार्च रोजी आपल्या माहेरी जाण्यासाठी निघालेल्या शीतल हिने दागिने परिधान करण्यासाठी कपाटाचे लॉकर उघडून पाहिले तर काही किरकोळ छोटे दागिने सोडून सुमारे ४० ग्राम वजनाचे मंगळसूत्र सापडले नाही .याबाबत तिने घरातील सदस्य सासू सासरे , नणंद , पती यांना संगीतल्यानन्तर याबाबत त्यांना काहीच माहिती नसल्याने दागिने नाहीसे म्हणजेच चोरीला गेल्याचे लक्षात आले .यामुळे शीतल हिने मांडवी पोलीस ठाणे गाठून दागिने लंपास झाल्याची तक्रार दाखल केली आहे.या बाबत मांडवी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पुण्यनगरी पु.पा.१.

# दुचाकी चोरणाऱ्या तिघांना अटक

## ▌वालीव पोलिसांकडून सुमारे ३.५ लाखांचा मुद्देमाल जप्त



**। नालासोपारा :** दुचाकी चोरणाऱ्या तीन आरोपींना वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून सहा गुन्ह्यांची उकल करून चोरीची १ रिक्षा, ५ दुचाकी असा एकूण ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नाईकपाडा येथील शिवभीमनगर येथील अन्वर कुरुश (२१) या तरुणाची दुचाकी चोरीस गेली होती. त्याने ९ मार्चला रात्री मेजरवाडी येथील सलामत चिकन शॉपसमोर दुचाकी पार्किंग केली असता चोरट्याने चोरली. याप्रकरणी वालीव पोलिसांनी वाहनचोरीचा गुन्हा दाखल केला होता.

वसई विरार परिसरात मोटार वाहनचोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता परिमंडळ-२ च्या पोलीस उपायुक्तांनी वाहनचोरीचे गुन्हे उघड करण्याचे आदेश दिले. सातीवलीतून जेरबंद वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोधमोहीम राबवून सातीवली परिसरातून आरोपित रोहित राजेश सिंग, अनिल कपूर सिंग व मोहन हरजित सिंग यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपींकडे चौकशी करून वसई, विरार आणि नालासोपारा परिसरातून चोरी केलेल्या १ रिक्षा आणि ५ दुचाकी असा एकूण ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. तसेच वालीव येथील ४, तुळींज येथील १ आणि पेल्हार येथील १ अशा ६ गुन्ह्यांची उकल केली आहे.

लोकमत पु.पा.१.

# पोलिस असल्याचे सांगून कोट्यवधींची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील विरार टोल नाक्याजवळील ३०० मीटर अंतरावर पोलिस असल्याची बतावणी करून १८ मार्चला रात्री ५ कोटी ३५ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. मांडवी पोलिसांनी सोमवारी गुन्हा दाखल केला आहे.

१८ मार्चला दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास अडाजन सुरत येथून क्रेटा कारमध्ये ५ कोटी १५ लाख रुपये रोख रक्कम घेऊन चालक बाबू स्वामी, अक्षय ठाकूर व श्रवण ठाकूर हे तिघे मुंबई येथे जात होते. रात्री ८ ते ९ वाजण्याच्या सुमारास मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील विरार टोल नाका पास करून सुमारे ३०० मीटर अंतरावर आले.



### रक्कम घेऊन पसार

- कारचालक बाबू स्वामीने तोंडावर पाणी मारण्यासाठी गाडी रोडच्या कडेला थांबवली. त्यावेळी त्यांच्या कारच्या पाठीमागून ग्रे रंगाच्या कारमधून पाच अनोळखी आरोपी येऊन त्यांनी पोलिस असल्याचे सांगत ओळखपत्र दाखवले.
- **दोन आरोपींनी श्रवणला वेगनार गाडीत बसवून घेऊन गेले. श्रवणच्या कारमध्ये तीन आरोपींनी अक्षय ठाकूर व चालक बाबू स्वामी यांना बसवून त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी उतरवले. नंतर गाडीतील रक्कम घेऊन पसार झाले.**

CamScanner

पु.प.३ लोकमत पु.प.२० पु.प.१

# पानटपऱ्यांवर 'एफडीए'चे छापे, गुटख्यासह १० विक्रेत्यांना अटक

## भाईंदर, नवघर व मीरा रोड पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** अन्न व औषध प्रशासनाने शासनाने बंदी घातलेला गुटखा व तंबाखू विकणाऱ्या पान टपरी चालकांवर मंगळवारी कारवाई करत १० पान टपरी चालकांना गुटखा साठ्यासह अटक केली आहे. याप्रकरणी भाईंदर, नवघर व मीरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर पान टपरीच्या मूळ मालकांवर पोलिस कारवाई करणार काय, याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

मीरा-भाईंदरमध्ये बंदी असलेला घातक असा गुटखा व सुगंधी तंबाखू आदींची उघडपणे विक्री होत असून पोलिसांचे हप्ते बांधलेले असल्याने गुटखा विक्रेते व तस्कर हे मोकाट असल्याचे आरोप होत असतात. दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी माणिक जाधव, प्रशांत पवार व भरत वसावे यांनी मंगळवार १९ मार्च रोजी मीरा-भाईंदरमध्ये गुटखा विकणाऱ्या पानटपरी चालकांवर धाडी टाकल्या.



### प्रतिबंधित वस्तूंचा साठा केला जप्त

याप्रकरणी मीरा रोड, भाईंदर व नवघर पोलिस ठाण्यात तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून प्रतिबंधित गुटखा-पान मसाला व सुगंधी तंबाखू आदींचा साठा जप्त करण्यात आला आहे.

भाईंदर पोलिस ठाणे हद्दीत भरत वसावे यांच्या फिर्यादीवरून गुटखा विक्रेते आरोपी सदाशिव देवीप्रसाद विश्वकर्मा (३४), अजय महादेव बहादूर (४०), गजराज रामलखन चौरसिया (६०) या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

### अटक केलेल्या आरोपींची नावे

- तिघांना भाईंदर पोलिसांनी १९ मार्चच्या रात्री अटक केली आहे. मीरा रोड पोलिस ठाण्यात माणिक जाधव यांच्या फिर्यादीवरुन दाखल गुन्ह्यातील गुटखा विक्रेते सुनीलकुमार श्यामलाल चौरसिया (३२), मोनू जोखू चौरसिया (३१) आणि मोहम्मद समीम अली हुसेन अन्सारी (४०) अशी अटक आरोपींची नावे आहेत.
- नवघर पोलिस ठाण्यात प्रशांत पवार यांनी दाखल गुन्ह्यानुसार जैन बंगल्याजवळील नंदिनी पान शॉप चालक सूरज रामस्वरत चौरसिया (२९) येथील हर हर महादेव पानशॉप चालक कृपाशंकर राजाराम चौरसिया (२८), कल्याणी बारजवळील सोनू पानशॉप चालक अनुराग जिमीपाल सिंग (२१) व न्यू गोल्डन नेस्ट येथील महालक्ष्मी पानशॉप चालव राजेंद्र रामबच्चन चौरसिया (२७) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

# गाडीतून मोबाइल चोरला

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरागाव येथील ए.जी. नगरमध्ये राहणारे बिनयामिन गुलाम रब्बानी खत्री (वय ४५) हे सायंकाळी मुंबई - अहमदाबाद महामार्गावर प्रसाद हॉटेलसमोर काशिमीरा मार्गिकेवर जाण्यासाठी यू-टर्न घेण्यासाठी थांबले होते. तेव्हा एक अनोळखी इसम हा गाडीच्या पुढील बाजूच्या एका दरवाजाकडे तर दुसरा दुसऱ्या दरवाजाकडे आला व खिडकीच्या काचेवर हाताने मारू लागला. खत्री यांनी विचारणा करण्यासाठी काच खाली केली असता चालकाच्या बाजूच्या सीटवर असलेला मोबाइल चोरला. अभिषेक शास्त्री यांच्या बाबतीतदेखील असाच प्रकार घडून त्यांचा मोबाइल चोरण्यात आला. काशिमीरा पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# डोक्यात रॉड मारून केले जखमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मुंबईच्या विलेपार्ले येथील शितला मंदिरजवळ राहणारे शंकर अरुणाचलम देवेंद्र (वय २८) हे १९ मार्च मंगळवार रोजी पहाटे साडेचारच्या दरम्यान काशिमीरा, डॉन बॉस्को शाळेजवळ चालले असताना मागून आलेल्या दोन अनोळखी पुरुष व एका महिलेने शंकर यांना शिवीगाळ केली. तसेच रॉडने डोक्यात मारून जखमी केले. याप्रकरणी काशिमीरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, उपनिरीक्षक अशोक भानसी हे तपास करत आहेत.

# नोकराने केली डॉक्टरकडे चोरी

**नालासोपारा :** नाळा-नंदाखाल रोडवरील शिंदीवाडीच्या हिरल फाउंडेशन येथे राहणारे डॉ. सुहास राव (६१) यांच्या येथे १ मार्चला सकाळी नोकराने चोरी केली आहे. ते घटनेच्या दिवशी झोपलेले असताना त्याचा फायदा घेऊन त्यांचा नोकर राजू नाईक याने ५० हजारांची दुचाकी, १० हजार ६०० रुपये रोख, १२ हजारांचा लॅपटॉप, बँकेचे डेबिट कार्ड असा एकूण ७२ हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे. नालासोपारा पोलिसांनी सोमवारी गुन्हा दाखल केला आहे.

# मांडवीत घरफोडी

**नालासोपारा :** चांदीपच्या आंबेडकरनगर येथील शीतल गायकवाड (३३) यांच्या घरी २४ फेब्रुवारी ते १९ मार्च दरम्यान लाखोंची घरफोडी झाली आहे. चोरट्याने बेडरूम मधील लोखंडी कपाटातून १ लाख ६० हजार रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र, १ लाख २० हजारांचे २ सोन्याचे नेकलेस, ८० हजारांचे दोन सोन्याचे कर्णफुलांचे जोड, ६४ हजारांची सोन्याची चेन असे एकूण ४ लाख २४ हजारांचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहे. मांडवी पोलिसांनी मंगळवारी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# मीरा रोडमधून दुचाकी चोरीला

**मीरा रोड :** रामदेव पार्कमधील रामटेक इमारतीत राहणारे अँथोनी डिसूजा हे कूकचे काम करतात. त्यांनी त्यांची दुचाकी शिवार उद्यान येथील एका हॉटेलजवळ रस्त्यावर सकाळी उभी केली होती. पंधरा मिनिटांनी जाऊन पाहिले असता त्यांची दुचाकी चोरीला गेली होती. मीरा रोड पोलिस ठाण्यात सोमवारी ५६ हजार ५०० रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार बालाजी हरणे हे तपास करीत आहेत.

CamScanner


लोकमत पु. ५/१.

खेळाडूसह ग्रामस्थांमध्ये संताप

# भाईंदरमध्ये 'हेलिपॅड'साठी मैदानांचा बळी?

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेस हेलिपॅड उभारण्यासाठी खेळांच्या मैदानाचा बळी देण्याचा चंग शासनाने बांधला आहे. सुभाषचंद्र बोस मैदानात हेलिपॅड उभारण्याचे काम बंद पाडल्यानंतर आता चौक येथील खेळाच्या मैदानात हेलिपॅड उभारण्याचा खटाटोप सार्वजनिक बांधकाम विभागाने चालविल्याने खेळाडू व ग्रामस्थ संतप्त आहेत. उत्तन येथील केशवसृष्टी-रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे बडे राजकीय नेते, मंत्र्यांचे दौरे असतात. यांच्यासाठी हे हेलिपॅड होत आहे.



भाईंदरमधील चौक येथे खेळाच्या मैदानात हेलिपॅड उभारण्याचा प्रयत्न सार्वजनिक बांधकाम विभागाने चालविला आहे.

१ या भागात केशवसृष्टी व प्रबोधिनीकडे प्रचंड प्रमाणात जमीन असून येथे त्यांचे एक हेलिपॅडही आहे. शिवाय शहरात आयत्यावेळी तात्पुरते हेलिपॅड म्हणून वापर करता येण्याजोगी जमीन आहे. तसे असताना शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने भाईंदरच्या सुभाषचंद्र बोस मैदानात १ मार्च रोजी पक्क्या स्वरूपाचे हेलिपॅड उभारण्यासाठी खोदकाम सुरू केले होते. त्याला खेळाडूंसह भाजप मंडळ अध्यक्ष शैलेश म्हामुणकर, स्थानिक भाजपा नेते अॅड. रवी व्यास, आमदार गीता जैन आदींनी विरोध केल्यानंतर ते काम थांबवण्यात आले होते.

२ सुभाषचंद्र बोस मैदानातील हेलिपॅडचे पक्के बांधकाम करणे रद्द झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेकेदारास दिलेले काम पूर्णपणे रद्द होऊन त्याचे नुकसान होऊ नये म्हणून उत्तनच्या चौक येथील खेळाच्या मैदानात पक्के हेलिपॅड बांधण्याचा घाट घातला आहे. चिमाजी अप्पा स्मारकाजवळ असलेल्या या क्रीडांगणाचे आरक्षण पूर्वीपासून आहे. खेळाडूंना खेळण्यासाठी चौक, पाली, उत्तन, डोंगरी, तरोडी भागातील हे एकमेव खेळाचे मैदान आहे. शासनाच्या वतीने या मैदानात पक्के व कायमस्वरूपी हेलिपॅड बांधण्याचा घाट घातला जात आहे.

३ सरकार एकीकडे खेळास प्रोत्साहन मिळाले पाहिजे, मुलांनी मैदानी खेळ खेळले पाहिजे, असे सांगते आणि दुसरीकडे खेळण्यासाठी मैदानाचे आरक्षण असूनही एकमेव मैदानात पक्के हेलिपॅड उभारण्याचा घाट घालते, हे संतापजनक असल्याच्या भावना येथील खेळाडूंनी बोलून दाखवल्या. न्यायालयांचे खेळाच्या मैदानाच्या संरक्षणाबाबतचे आदेश आहेतच, शिवाय कायद्यानेही खेळाचे मैदान हे खेळासाठी वापरले जाणे आवश्यक आहे.

CamScanner